# रवळनाथ कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दहा टक्के वाढ : चौगुले

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. २७ : श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीच्या कायम सेवेतील कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात १ एप्रिलपासून दहा टक्के वाढ केल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

ते म्हणाले, ''कोरोना महामारीमुळे गेली दोन वर्षे कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता दिलेला नव्हता. परंतु काही महिन्यांपासून कोरोना ओसरल्यामुळे अर्थव्यवस्था पूर्वपदावर येत आहे. यामुळे संस्थेच्या व्यवसायातही वाढ होण्याची अपेक्षा आहे. म्हणूनच कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढविण्याचा निर्णय संचालक मंडळाने एकमताने घेतला. ३१ मार्च २०२२ अखेर संस्थेत ११२ कर्मचारी आहेत. त्यांना एप्रिल २०१४ पासून सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन दिले जाते. प्राव्हिडंड फंड, ग्रॅच्युईटी, पेन्शन, मेडीक्लेम, रजेचा पगार, बोनसचे लाभ दिले जातात. याशिवाय दरवर्षी उत्कृष्ट कर्मचारी व शाखांनाही गौरविले जाते. महागाई भत्त्यात वाढ झाल्याने कर्मचाऱ्यांचे वेतन १५ ते ६५ हजारापर्यंत झाले. शिपायांचे वेतन १५ ते २५, क्लार्क-कॅशियरचे १९ ते २९, लेखापालांचे २७ ते ३०, शाखाधिकाऱ्यांचे ३० ते ३८ हजार व प्रधान कार्यालयातील अधिकाऱ्यांना ३२ ते ६५ हजाराची भरीव वाढ झाली.



**एम. एल. चौगुले**